विषय:-सन २०१७-१८ साठी ठिबक सिंचन संच उत्पादक कंपन्याच्या नोंदणीसमान्यता प्रदान करणेबाबत.

**कृषि आयुक्तालय,**
**महाराष्ट्र राज्य,शिवाजीनगर पुणे-४११ ००५.**

क्र.कृआआ-२०१७/सुसिंयो/उनोंनु/आदेश/ठिबक/प्र.क्र.०७/२२२५/फलो-४
दिनांक : 14 सप्टेंबर, २०१७.

**वाचा :-१) शासन निर्णय क्रमांक सुसिंयो-२११७/प्र.क्र.१०७/१७/४-अे, दि.०७ ऑगस्ट,२०१७.**
**२) केंद्र शासन मार्गदर्शक सुचना फ.नं.११-१४२/२०१५-हॉर्ट.दिनांक २५ ऑगस्ट,२०१७.**
**३) शासन पत्र क्र.ssy-2017/C.R.121/17/4-1,दि.०१.०९.२०१७ सोबतचे प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजनेंतर्गत ४ थ्या राज्यस्तरीय मान्यता समितीचे इतिवृत्त**

## आदेश

उपरोक्त वाचा येथिल संदर्भ क्र.३ नुसार निर्गमित केलेल्या प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजनेंतर्गत ४ थ्या राज्यस्तरीय मान्यता समितीच्या इतिवृत्तांतातील मुद्या क्र.२(i) मध्ये सुचित केल्यानुसार सोबत जोडलेल्या ***परिशिष्ट- १*** मध्ये नमूद केलेल्या वैध बी.आय.एस. प्रमाणपत्र धारण करणाऱ्या ***०४ ठिबक सिंचन संच उत्पादक कंपन्यांच्या*** नोंदणीस सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या जिल्हयामध्ये सुक्ष्म सिंचनाची कामे करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१. सूक्ष्म सिंचन योजना अंमलबजावणीसाठी ठिबक सिंचन संच उत्पादक कंपन्यांची नोंदणी ***सन २०१७-१८ ते २०२१-२२*** या पाच वर्षासाठी वैध राहील. मात्र सदरहू कंपन्यांनी पुढील प्रत्येक वर्षी कृषि आयुक्तालयाने विहित केलेले नोंदणी शुल्क रु.२५,०००/- भरुन नोंदणीचे नुतनीकरण करणे आवश्यक आहे.
२. सूक्ष्म सिंचन संच उत्पादक कंपनी प्रतिनिधी व कृषि आयुक्तालयाने निश्चीत केल्यानुसार कृषि आयुक्तालय व सूक्ष्म सिंचन संच उत्पादक कंपनी यांच्यामध्ये करावयाचा करारनाम्याच्या नमुन्यामध्ये रुपये १००/- च्या स्टॅम्पपेपरवर नोटराईज्ड करारनामा करून तो एक महिन्याच्या आत सुक्ष्म सिंचन उत्पादक कंपनीने आयुक्तालयास सादर करावा.
३. सोबतच्या यादीत नमूद केलेल्या ठिबक सिंचन संच उत्पादक कंपन्यांची सन २०१७-१८ मध्ये नोंदणी केलेली आहे, त्या सर्व कंपन्यांनी प्रत्येकी रु.२,००,०००/- रक्कमेची बँक गॅरंटी रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर एक महिन्याच्या आत कृषि आयुक्तालयास सादर करावयाची आहे.
४. या आदेशान्वये नोंदणी केलेल्या कंपन्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या प्रत्येक घटकांच्या बीआयएस वैध मुदतीपर्यंतच त्या कंपनीची नोंदणी राहिल. बीआयएस नुतनीकरणाची कागदपत्रे विहित मुदतीत कृषि आयुक्तालयास सादर करण्याची जबाबदारी संबंधीत कंपनीची राहील. अशी कागदपत्रे वेळेत सादर न केल्यास त्या कंपनीची नोंदणी घटकनिहाय बीआयएस मुदतीच्या अंतिम तारखेनंतर आपोआप रद्द होईल.
५. विहित घटकांच्या बीआयएस नोंदणीबाबतची/नुतनीकरणाची प्रमाणपत्रे संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना सुध्दा वर नमूद केल्याप्रमाणे वेळेत सादर करणे संबंधीत कंपन्यांना बंधनकारक राहील.
६. नोंदणीच्या वेळी नोंदणीकृत कंपन्यानी सादर केलेल्या दरपत्रकातील दरापेक्षा जास्त दराने कोणत्याही घटकांची विक्री करता येणार नाही. तसेच सदरचे दरपत्रक कृषि आयुक्तालयाच्या इ-ठिबक आज्ञावलीवर

नोंदणीवेळी नोंदणीकृत कंपन्यानी भरणे बंधनकारक आहे. नोंदणीकृत कंपन्यांनी त्यांच्या दरपत्रकात त्या आर्थिक वर्षात वाढ किंवा घट केल्यास इ-ठिंबक आज्ञावलीवर भरणे व कृषि आयुक्तालयास त्वरित कळविणे त्यांचेवर बंधनकारक राहील.

७. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनामध्ये नमूद केल्यानुसार प्रत्येक जिल्हयात विक्रिपश्चात सेवा केंद्र उभारणी करणे व त्याबाबतची आवश्यक ती माहिती जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना सादर करुन त्यांची तपासणी करुन घेण्याची जबाबदारी संबधीत नोंदणीकृत कंपन्यांची राहील. नोंदणीस मान्यता प्राप्त होताच नवीन विक्रीपश्चात सेवा केंद्राची एक महिन्यात तपासणी करुन घेऊन त्याचा अहवाल कृषि आयुक्तालयास सादर करण्याच्या अटीच्या अधिन राहून सन २०१७-१८ साठी नोंदणी करण्यात येत आहे.

८. नोंदणीकृत कंपन्यानी मान्यता दिलेल्या प्रत्येक जिल्हयातील त्यांच्या वितरकांची यादी नोंदणीसाठी संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयाकडे सादर करुन त्यांची नोंदणी करुन घेणे आवश्यक आहे.

९. कंपनीच्या सर्व अधिकृत वितरकांनी विहित नमुन्यात साठा नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. सदरची नोंदवही सुक्ष्म सिंचन उत्पादक कंपनीच्या अधिकृत प्रतिनिधीनी, वितरक व संबधीत तालुका कृषि अधिकारी यांनी संयुक्तरित्या प्रमाणित करणे बंधनकारक आहे. तसेच प्रत्येक महिन्याच्या शेवटी सदर साठा पडताळणी करुन प्रमाणीत करणे आवश्यक राहील. तसेच नोंदणीकृत कंपनीने उत्पादीत केलेल्या व वितरकांना पुरवठा केलेल्या सर्व घटकांचा घटकनिहाय अहवाल दरमहा महिना संपताच पुढील माहिन्याच्या १० तारखेपर्यततालुका कृषि अधिकारी वकृषि आयुक्तालयास सादर करणे आवश्यक आहे.

१०. नोंदणीकृत कंपन्यांनी नियुक्त केलेल्या अधिकृत वितरक / विक्रेते, अधिकृत प्रतिनिधी यांनी अनियमितता अथवा शेतकरी, शासन इत्यादिची फसवणूक केल्यास त्या बाबीस वितरक / विक्रेत्या बरोबरच कंपनी प्रतिनिधी व कंपनीसुध्दा जबाबदार राहील.

११. सन २०१७-१८ साठी मार्गदर्शक सुचना कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र.कृआआ/२०१७/सुसिंयो/ प्र.मं.कृ.सिं.यो/प्र.मा./प्र.क्र.०१/२०६५/फलो-४, दिनांक २८ ऑगस्ट २०१७ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. यापुढे केंद्र, राज्य शासन व कृषि आयुक्तालय स्तरावरुन वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या सुचना, अटि व शर्ती सुक्ष्म सिंचन संच उत्पादक कंपन्या व त्यांच्या अधिकृत वितरकांवर बंधनकारक रहातील.

१२. सोबतच्या परिशिष्ट-१ मध्ये नमुद ठिबक सिंचन संच उत्पादक कंपन्यांना सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात सुक्ष्म सिंचन योजनेंतर्गत नोंदणीस मान्यता दिलेल्या दिनांकापासून काम करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

**सोबतः नोदणीस मान्यता देण्यातआलेल्या**
**ठिबक सिंचन संच उत्पादकांची यादी.**

**संचालक,फलोत्पादन**
कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे

**प्रति,**

मे.------------------------
--------------------------
--------------------------
--------------------------

**प्रतिलिपी - यांना माहितीसाठी व पुढील प्रमाणे कार्यवाहीसाठी अग्रेषीत.**

**१) विभागीय कृषि सहसंचालक, सर्व**

**२) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, (सर्व)**

१. सन २०१७-१८या वर्षासाठी नोंदणीस मान्यता देण्यात आलेल्या परिशिष्ट-१ मधिल सुक्ष्म सिंचन संच उत्पादकांचे अधिकृत विक्रेते / वितरकांची जिल्हास्तरावर संबधीत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी नोंदणी करणे बंधनकारक आहे. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी वितरक नोंदणीसाठी आवश्यक असलेले व कृषि आयुक्तालयाने विहित केलेले ***शुल्क रु.२,७५०/- (अक्षरी रु.दोन हजार सातशे पन्नास फक्त) ग्रासप्रणालीव्दारे / चलनाव्दारे खालील लेखाशिर्षांतर्गत भरुन घ्यावे.*** तसेच रु.१०,०००/- (अक्षरी रु.दहा हजार फक्त) रकमेची बँक गॅरंटी घेवून वितरकांची नोंदणी करावी.(ठिबक व तुषार या करीता शुल्क स्वतंत्र भरण्याची आवश्यकता नाही.)

**मागणी क्र.डी.-१**
**०४०१ - पीक संवर्धन**
**८००, इतर जमा रकमा**
**(०१)(१२) इतर बाबी**
**(०४०१०४५५)**

२. संबधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व त्यांचे जिल्हातील सुक्ष्म सिंचन वितरक या दोघामधील कृषि आयुक्तालयाने विहित करुन दिलेल्या नमुन्यातील करारनामा जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी रु.१००/-च्या स्टँम्प पेपरवर नोटराइज्ड करुन घ्यावा.

३. नोंदणीकृत कंपनीच्या जिल्हयातील विक्रिपश्चात सेवा केंद्राची तपासणी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी स्वतः किंवा त्यांचे अधिनस्त असलेल्या गट-अ अथवा गट-ब मधील अधिकाऱ्यांमार्फत कंपनीची कृषि आयुक्तालयस्तरावरुन नोंदणी झाल्यापासून एक महिन्याच्या आत तपासणी करुन त्यास मान्यता द्यावी.

**संचालक,फलोत्पादन**
कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे

परिशिष्ट- १

## सन २०१७-१८ साठी नोंदणीस मान्यता देण्यात आलेल्या ठिबक सिंचन संच उत्पादकांची यादी

| Sr. No. | Name of Company Address and Phone No | Brand Name | BIS Registration Number and Validity | | | | Districts for which registration given | Registration Period |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | lateral BIS- 12786 CML no. & validity | Emitter (online) BIS- 13487 CML no. & validity | Inline BIS- 13488 CML no. & validity | Filter BIS- 12785 CML no. & validity with brand name | | |
| 1 | M/s Green India irrigation Pvt Ltd A-76,MIDC Khandala, Shreerampur, Dist-Ahmednagar Email - greinco@gmail. com | Green India | 7500152910 01.06.2018 | 7800012014 25.02.2018 | 7500152809 01.06.2018 | 3006128 30.06.20178 7714781 01.03.2018 | Latur,Osmanbasd,beed, Parbhani, Nanded, Aurangabad, Jalna,Nashik, Ahmednagar,Pune,Solapur, Dhule,Jalgaon,Sangli,Satara,Buldana,Amrawati,Akola,Washim, Ywatmal(**21 District**) | 2017-18 to 2021-22 |
| 2 | M/s Tejas agro Irrigation systems Pvt Ltd. Gat No-97/11 Bhandishedgaontq-pandharpur Dist -solapur sducentral@netafim-india.com | Tejas | 7500151512 08.05.2018 | 7800012014 25.02.2018 | 7500151411 08.05.2018 | 3889901 31.03.2018 | Latur,Osmanbasd,beed, Parbhani, Nanded,Hingoli Aurangabad,Jalna,Nashik, Kolhapur,Ahmednagar,Pune, Solapur, Dhule,Jalgaon, Sangli,Satara,Buldana,Amrawati, Akola,Washim,Ywatmal, Nagpur, Thane(**24 District**) | 2017-18 to 2021-22 |
| 3 | M/s FinolexPlasson Industries Pvt Ltd. Corporate Office- 4 floor, Rajiv Gandhi Infotech ParkPhaze-1 Hinjewadi, pune finolexplasson@fpil.in factory Plote No.399URSE Tal-Maval, Pune | Finolex FPIL | 7085170 Dt- 31/05/2018 | 7121148 Dt. 31/05/2018 | 7500120711 Dt.1/02/2018 | 3006128 Dt. 30/06/2018 7714781 Dt. 1/03/2018 7130856 Dt. 28/02/2018 3889901 Dt. 31/03/2018 | Latur,Osmanbasd, Parbhani, Nanded,Hingoli,Aurangabad, Jalna, Beed,Nashik,Nandurbar, Dhule,Jalgaon, Kolhapur, Sangli,Satara,Ahmednagar,Pune, Solapur,Buldana,Amrawati,Akola ,Washim,Ywatmal,Nagpur, Chandrapur,Gondiya,Bhandara, Wardha,Gadchiroli,Thane, Raigad, ratnagiri,Sindudurga, Palghar (**34 District**) | 2017-18 to 2021-22 |

**संचालक(फलोत्पादन)**
कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे

| Sr. No. | Name of Company Address and Phone No | Brand Name | BIS Registration Number and Validity | | | | Districts for which registration given | Registration Period |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | lateral BIS- 12786 CML no. & validity | Emitter (online) BIS- 13487 CML no. & validity | Inline BIS- 13488 CML no. & validity | Filter BIS- 12785 CML no. & validity with brand name | | |
| 4. | M/s Tulsi Extrusion Pvt Ltd. N-99 /100 MIDC Area, Jalgaon-425003 contact@tulsigroup.com | Tulsi | 7852894 Dt-15/07/2018 | 3638064 6/06/2018 | 7852793 15/07/2018 | 3006128 Dt.30/06/2018 | Nashik,Nandurbar, Dhule,Jalgaon, Aurangabad,Jalna, Beed, Latur,Osmanbasd, Parbhani, Nanded,Hingoli, Ahmednagar,Pune, Solapur, Kolhapur, Sangli,Satara, Buldana,Amrawati,Akola, Washim,Ywatmal **(23 District)** | 2017-18 to 2021-22 |

**संचालक(फलोत्पादन)**
कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे